# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक ०६/०४/२०१८**

## १) रेती (वाळु) चोरी :-

**देगलुर :** दिनांक ०५.०४.२०१८ रोजी चे ०१.०० वा. चे सुमारास वंसुधरा हाऊस समोर नरंगल ते शहापुर जाणारे रोडवर, ता.देगलुर जि.नांदेड येथे यातील ट्रक चालक व मालक यांनी संगणमत करुन विनापरवाना बेकायदेशीर रित्या अंदाजे किंमत २,०२,८८,०००/- रुपयाचा माल ट्रक मध्ये रेती (वाळु) भरुन चोरटी विक्री करतानां मिळुण आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/शिवप्रकाश प्रभाकर मुळे, ने.पो.अ.वि.पथक** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. देगलुर** गुरनं १२८/२०१८ कलम ३७९, ३४, भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/मराडे, मो.क्र. ९९२२१११२३९३** हे करीत आहेत.

## २) फसवणुक :-

**विमानतळ :-** दिनांक ०४.०४.२०१८ रोजी चे १५.४८ वा.चे सुमारास सिटी प्राईड हॉटेलच्या बाजुला जानकीनगर, नांदेड येथे यातील आरोपीने फिर्यादी यास (मोबाईल नंबर ७५४६०५१८२२) या नंबर वरुन कॉल करुन तुम्ही बजाज फॉयनॉन्स चे सभासद आहात असे भासवुन फिर्यादीचे ए.टी.एम.चा १६ अंकी नंबर मागुन संदेश पाठवुन ३ वेळेस ६ अंकी नंबर मागुन त्याचे एस.बी.आय.खात्यातील ४९,९८८/- रूपये परस्पर काढुन घेतले व फसवणुक केली वगैरे **फिर्यादी शिवाजी पि.बापुराव केंद्रे, वय ३६ वर्षे व्यवसाय व्यापार रा.नाथनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. विमानतळ** गुरनं ८०/२०१८ कलम ४२०, भादवी सह कलम ६५ (सी), (डी), आय.टी.ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/मद्दे, मो.क्रं.९०४९९१८०००** हे करीत आहेत.

## ३) बेकायदेशिररीत्या शिंदी बाळगुन मिळुन आला :-

**नायगांव :-** दिनांक ०५.०४.२०१८ रोजी चे १४.३० वा. चे सुमारास आरोपीचे घरी मौ.पिंपळगाव, ता.नायगांव जि. नांदेड येथे यातील आरोपीने विनापरवाना बेकायदेशिररित्या शिंदीचे ६५० एम.एल.चे १० पॉकेट अंदाजे किंमत १,४४०/- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःच्या ताब्यात बाळगलेला मिळुन आला, वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/१८७४ भगवान नारायण कंधारे, ने. पो. स्टे. नायगाव** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. नायगांव** गुरन ३३/२०१८ कलम ६५ (ई) महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१८७४ भगवान नारायण कंधारे, मो.क्र. ९४२१४८६७०६** हे करीत आहेत.

## ४) जळुन मृत्यु :-

**बारड :-** दिनांक ०४.०४.२०१८ रोजी चे ०८.०० वा. ते दि.०५.०४.२०१८ चे ०८.०० वा. चे दरम्यान मयताचे शेतात डोंगरगाव शिवार, ता.मुदखेड जि.नांदेड येथे, यातील **फिर्यादीची आई मयत नामे अनुसयाबाई सोपान गोवंदे, वय ६२ वर्षे रा. डोंगरगाव, ता.मुदखेड जि.नांदेड** ही तिचे शेतात अचानक जळुण मरण पावली. वगैरे **खबर देणार गंगाधर सोपान गोवंदे, वय ४४ वर्षे र रा. डोंगरगाव, ता.मुदखेड जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.बारड** आ.मृ. ०७/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ.मृ. दाखल असुन **तपास पोहेकॉ/४२३ किडे, मो.क्र. ०२४६२२७६४३३** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४